RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२ (१३)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ६, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक ५६

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XLIV OF 2025**

A BILL

TO PROVIDE FOR DEVELOPMENT AND ADMINISTRATION OF THE VOLUNTARY ORGANIZATIONS IN THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४४.**

**महाराष्ट्रातील राज्यातील स्वयंसेवी संस्थांच्या विकासासाठी व व्यवस्थापनासाठी तरतूद करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्रात मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम, १९५० यानुसार नोंदणी झालेले अनेक सार्वजनिक न्यास कार्यरत आहेत.

**आणि ज्याअर्थी,** ते करीत असलेल्या चांगल्या कार्याची व्याप्ती वाढत आहे व अशा उपक्रमांना प्रोत्साहन देण्याचे केंद्र शासनाचे व महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे.

**आणि ज्याअर्थी,** अशा न्यासांच्या विकासासाठी व व्यवस्थापनासाठी एक स्वायत्त महामंडळ स्थापण्यासाठी कायद्याने तरतूद करणे आवश्यक आहे, **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र स्वयंसेवी संस्था विकास व व्यवस्थापन महामंडळ अधिनियम, २०२५ असे म्हणता येईल.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) तो राज्य **शासन राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा तारखेस अंमलात येईल.

व्याख्या

**२.** (१) "स्वयंसेवी संस्था" म्हणजे संस्था नोंदणी अधिनियम, १८६०, मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम, १९५० वा कंपनी अधिनियम, १९५६ या खाली ना नफा तत्वावर नोंदणीकृत संस्था.

(२) "महामंडळ" म्हणजे कलम ३ अन्व्ये स्थापन करण्यात आलेले स्वयंसेवी संस्था विकास व व्यवस्थापन महामंडळ.

महामंडळाची स्थापना.

**३.** राज्य **शासन राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी संपूर्ण राज्यासाठी "महाराष्ट्र स्वयंसेवी संस्था विकास व व्यवस्थापन महामंडळ" या नावाचे एक महामंडळ स्थापन करील.

संस्थांनी महामंडळाचा सभासद होणे व उद्दिष्टांनुसार त्यांचे वर्ग पाडणे.

**४.** नाममात्र वर्गणी भरुन स्वयंसेवी या महामंडळाचे सभासद होता येईल. सभासद होते वेळी संस्थेला आपण कोणत्या वर्गात मोडतो स्पष्ट करावे लागेल. संस्थांच्या मुख्य उद्दिष्टांनुसार त्यांचे वर्ग पाडण्यात येतील.

महामंडळाची स्थापना.

**५.** (१) महामंडळामध्ये प्रत्येक वर्गात मोडणाऱ्या संस्थांच्या सदस्य संख्येनुसार २५ संख्यांपेक्षा कमी असणाऱ्या सदस्य संख्यांमधून प्रत्येक वर्गातील प्रत्येकी एक प्रतिनिधी व २५ पेक्षा अधिक संख्या असणाऱ्या सदस्य संख्यांमधून प्रत्येक वर्गातील प्रत्येकी दोन प्रतिनिधी निवडण्यात येतील.

(२) राज्य शासनाच्या आदिवासी कल्याण विभाग, समाजकल्याण विभाग, जलसंधारण विभाग, आरोग्य विभाग, ग्रामविकास विभाग, शिक्षण विभाग आणि विधी व न्याय विभाग या विभागांचे सचिव आणि धर्मादाय आयुक्त हे या महामंडळाचे पदसिद्ध सदस्य असतील.

(३) महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षांनी व महाराष्ट्र विधापरिषदेच्या सभापतींनी नामनिर्देशित करावयाचा महाराष्ट्र विधानसभेचा व महाराष्ट्र विधानपरिषदेचा प्रत्येकी एक सदस्य महामंडळाचा सदस्य म्हणून असेल.

(४) शासनाने नियुक्त केलेला पूर्णवेळ अधिकारी या महामंडळाचा सचिव म्हणून काम पाहील.

(५) महामंडळाचा अध्यक्ष महामंडळाच्या सदस्यांद्वारे व सदस्यांमधूनच तथापि, बिगर शासकीय प्रतिनिधींमधून नियुक्त करण्यात येईल.

महामंडळाच्या कार्यकरिणीचा अवधी.

**६.** महामंडळाच्या कार्यकरिणीचा अवधी राज्य शासन विहित करील अशा कालावधीकरिता असेल.

महामंडळाची कामे.

**७.** महामंडळाची कामे पुढीलप्रमाणे असतील :—

(१) स्वयंसेवी संस्थांच्या नोंदणी व व्यवस्थापन कायद्याच्या अंमलबजावणीतील अडचणी दूर करण्यासाठी राज्य शासनाला सहाय्य करणे.

(२) शासनाच्या विविध विभागांचे स्वयंसेवी संस्थांना आर्थिक सहाय्य देण्याविषयीचे प्रकल्प मंजूर करताना शासनाला सहाय्य करणे, परंतु महामंडळ कोणतेही प्रत्यक्ष अनुदान देणार नाही.

(३) सदस्यांनी स्वयंसेवी संस्थांच्या आणि शासकीय अधिकाऱ्यांकडून करण्यात आलेल्या तक्रारींची तपासणी करणे. तथापि, महामंडळ न्यायालयात आणि धर्मादाय आयुक्त कार्यालयात चालणाऱ्या संस्थाविषयक तंट्याच्या प्रकरणात हस्तक्षेप करणार नाही.

(४) महामंडळ दरवर्षी स्वयंसेवी संस्थांच्या कार्याविषयीचा एक अहवाल शासनाला सादर करील व तो जनतेच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येईल. या अहवालात धर्मादाय आयुक्त कार्यालयात

प्रविष्ट असलेल्या प्रकरणाची थोडक्यात माहिती असेल. त्याचबरोबर वार्षिक दहा लाखांपेक्षा अधिक उलाढाल असणाऱ्या संस्थांची नावे अहवालात नमूद केली जातील. शासनाच्या विभागाने कोणत्याही संस्थेस दहा लाखांपेक्षा अधिक अनुदान दिल्यास त्या संस्थेचे नाव आणि विशिष्ट कार्य करण्यासाठी दिलेल्या अनुदानाचे संकल्पित कार्य यांचाही समावेश या अहवालात असेल.

(५) स्वयंसेवी संस्थांना उपयुक्त अशी माहिती व प्रकाशने प्रसिद्ध करणे.

(६) ह्या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनांसाठी नियम तयार करणे.

(७) हा अधिनियम व त्याखाली केलेले विनियम याद्वारे तरतूद न करण्यात आलेल्या बाबींशी संबंधित असलेल्या बाबींकरिता उपविधी व विनियम करणे.

(८) ह्या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व कृती व गोष्टी करणे.

८. महामंडळाची बैठक दर दोन महिन्यांतून किमान एकदा घेण्यात येईल. महामंडळाची बैठक.

९. महामंडळास आपली कर्तव्ये व कामे कार्यक्षमरित्या पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील असे अधिकारी व कर्मचारी यांची शासनाच्या पूर्वमंजुरीने नियुक्ती करता येईल. महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी.

१०. (१) महामंडळाकडे आपला स्वतःचा निधी असेल व ते त्याचे परिरक्षण करील. महामंडळाचा निधी आणि त्याची अभिरक्षा.

त्या निधीत,—

(अ) अनुदाने, अर्थसहाय्य कर्जे, आगाऊ रकमा याद्वारे राज्य शासनाकडून किंवा अन्यथा मिळालेल्या सर्व रकमा,

(ब) या अधिनियमाखाली महामंडळास प्राप्त झालेली सर्व वर्गणी, खर्च आणि आकार,

(क) देणग्या,

(ड) बँकेतील ठेवींवर मिळणारे व्याज व इतर नफा.

(२) महामंडळाला भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ यामध्ये नमूद केलेल्या कोणत्याही अनुसूचित बँकेतील किंवा राज्य शासनाने याबाबतीत मान्यता दिलेल्या अन्य कोणत्याही बँकेतील चालू किंवा ठेव खात्यात निधी ठेवता येईल किंवा महामंडळाच्या स्वेच्छा निर्णयानुसार भारतीय न्यास अधिनियम, १८८२ याद्वारे प्राधिकृत करण्यात आलेल्या रोख्यांमध्ये गुंतविता येईल.

११. (१) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) ह्या अधिनियमनान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्यांच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करु नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील तर असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरुपात अंमलात येईल किंवा यथास्थिति मुळीच अंमलात येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

समाजातील आर्थिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या उपेक्षित असलेल्या घटकांचा मुलभूत विकास होण्याच्या दृष्टीने विकासाची फळे त्यांच्यामार्फत पोहोचायला हवीत. या लोकांच्या विकासासाठी महाराष्ट्रात अनेक संस्था कार्यरत आहेत व त्यांचे कार्यही लक्षणीय आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा शासन घेऊ शकते. या स्वयंसेवी संस्थांचे व्यवस्थापकीय नियंत्रण करण्यासाठी धर्मादाय आयुक्त कार्यालयाखेरीज वेगळी यंत्रणा नाही.

स्वयंसेवी संस्थांच्या कार्याला प्रोत्साहन देण्याचे केंद्र व राज्य शासनाचे धोरण असून ते परिणामकारक होण्यासाठी त्या दोघांमधील दुवा म्हणून एक यंत्रणा स्थापन करण्याची आवश्यकता आहे. या प्रयोजनार्थ राज्य पातळीवर स्वयंसेवी संस्थांच्या विकासासाठी व व्यवस्थापनासाठी स्वायत्त महामंडळ स्थापन करण्याचे प्रस्तावित केले आहे.

वरील उद्दिष्ट साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २६ मे, २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

## वित्तीय ज्ञापन

खंड ९ अन्वये "महाराष्ट्र स्वयंसेवी संस्था विकास व व्यवस्थापन महामंडळास आपली कर्तव्ये व कामे कार्यक्षमरित्या पार पाडण्यासाठी, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, आवश्यक वाटतील असे अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्तीची तरतूद आहे. महामंडळावरील उक्त अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनासाठी राज्याच्या एकत्रित निधी मधून कराव्या लागणाऱ्या प्रत्यक्ष आवर्ती खर्चाचा अंदाज या टप्प्यावर देता येणे शक्य नाही.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

१. या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड १.**—(३) या खंडाद्वारे, राज्य शासनास, राज्य **शासन राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा तारखेस हा अधिनियम अंमलात आणण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

**खंड ३.**—(३) या खंडाद्वारे, राज्य शासनास, **शासन राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ संपूर्ण राज्यासाठी महाराष्ट्र स्वयंसेची संस्था विकास व व्यवस्थापन महामंडळ नावाचे महामंडळ स्थापन करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे.

**खंड ११.**—(१) या खंडाद्वारे, राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता नियम करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वरील प्रस्ताव सामान्य स्वरुपाचे आहेत.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव -१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.